# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

**विषय : एम.फिल/पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याबाबत..**
**(M. Phil./Ph. D. Admission 2018-2019).**

एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे प्रवेश प्रक्रिया सुरू करावयाची असून याकरिता मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडून रिक्त जागांची माहिती दि. ०३/०१/२०१९ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेली होती. तथापी, काही मार्गदर्शकांनी रिक्त जागांची माहिती अद्ययावत केलेली नाही.

यासंदर्भात पुनश्च: कळविण्यात येते की, मार्गदर्शकांनी परिपत्रक क्र. २२६/२०१८ दि. ११/१२/२०१८ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार M.Phil./Ph.D. Guide Vacancy 2018-19 या लिंकवर आपल्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती स्व:ताच्या Teacher Login वरून ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या **unipune.ac.in** या संकेतस्थळावरून **दि. २०/०३/२०१९** पर्यंत आपल्या संशोधन केंद्रामार्फत सादर करावी.

ज्या मार्गदर्शकांना शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये विद्यार्थी घ्यावयाचे नसतील त्यांनीही आपल्याकडे नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती सादर करणे आवश्यक आहे. **दि. २०/०३/२०१९** नंतर रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :–

- ई–मेल आयडी :– phd.mphiladmis@pun.unipune.ac.in

उपकुलसचिव,
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/८७६
दिनांक : १२/०३/२०१९

प्रत :–

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे